**<u>रा.प.महामंडळाचे जाहिरातीपासूनचे उत्पन्न वाढविण्यासाठी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या जाहिरात परवानाधारकांची निविदा रद्द करून नविन जाहिरा त धोरण तयार करून नव्याने परवानाधारकाच्या नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.</u>**

*****

- महामंडळामध्ये ०६ जाहिरात प्रकारांच्या माध्यमातून महामंडळास प्रतिवर्ष सुमारे रु.२२ कोटी इतके मासिक उत्पन्न प्राप्त होत आहे. सदरच्या उत्पन्नात वाढ करण्याकरिता महामंडळामध्ये उपलब्ध असलेल्या संसाधनांचा पुरेपूर वापर करून त्यांच्यावर जाहिराती प्रसारित करून त्या द्वारे जाहिरात उत्पन्न वाढविण्यासाठी महामंडळाच्या संसाधनांची पाहणी व तपासणी करून त्या द्वारे महामंडळास जाहिरात माध्यमातून किती उत्पन्न प्राप्त होऊ शकते, याबाबतचा सविस्तर सर्वंकष अहवाल प्राप्त करून घेण्यासाठी बाह्यसंस्थेची स्वारस्य अभिव्यक्ति सूचनेद्वारे नियुक्ती करणे.
- स्वारस्य अभिव्यक्ति सूचनेअंती नियुक्त करण्यात आलेल्या बाह्य संस्थेमार्फत अहवाल प्राप्त करून घेऊन अहवालातील स्विकाहार्य असलेल्या मुद्दयांवर / जाहिरात माध्यमांवर ई- निविदा प्रक्रिया राबवून परवानाधारकाची नियुक्ती करणे.
- रा.प. महामंडळामध्ये सद्यस्थितीत विविध जाहिरात माध्यमांकरिता ई-निविदेद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या विविध जाहिरात परवानाधारकांचा परवाना करारपत्रातील / निविदा प्रपत्रामध्ये अटी व शर्तींच्या अधिन राहून त्यांना करार रद्द करण्याबाबतची नोटीस देणे.